Jagdamba Education Society's

Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing… Date: 25/06/2025

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या वाचाव्या, आपल्या वाचाव्या...
आपलं महानगर My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## प्रतिभावान संगीतकार मदन मोहन



हिंदी चित्रपट संगीताच्या सुवर्णकाळातील एक प्रतिभावान संगीतकार म्हणजे मदन मोहन. अतिशय भावोत्कट चाली देणारा हा संगीतकार गझल प्रांतातील बादशहा होता. मदनमोहन यांचा जन्म बगदाद, इराक येथे २५ जून १९२४ रोजी एका धनिक कुंटुबात झाला. त्यांचे वडील रायबहाद्दूर चुनिलाल कोहली हे एक वजनदार असामी होते. बगदादमधून रावळपिंडी-चकवाल येथे काही वर्षे वास्तव्य केल्यावर कोहली कुटुंब मुंबईत स्थायिक झाले. मदनमोहन यांचे देखणे रूप आणि संगीताची आवड ह्या दोन्ही गोष्टी आईकडूनच आल्या होत्या. लहानपणापासूनच त्यांना संगीताची अतोनात आवड होती. लखनौमध्ये मदन मोहन यांची खरी जडणघडण झाली. बेगम अख्तर, सिद्धेश्वरी देवी, बरकत अली खान व इतर अनेक दिग्गजांची गाणी मदनमोहन यांनी भरभरून ऐकली. खरं पाहता त्यांनी हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे शिक्षण असे घेतलेच नव्हते, पण त्यांनी एकलव्यासारखे श्रवणभक्तीतून खूपच ज्ञान मिळविले होते.

हिराबाई बडोदेकरांचा त्यांच्यावर प्रभाव होता व पुण्याच्या सवाई गंधर्वची वारीही त्यांनी कधी चुकविली नाही. मुंबईत काही काळ सचिनदेव बर्मन व श्यामसुंदरकडे उमेदवारी केल्यावर १९५० मध्ये त्यांनी पहिल्यांदा 'आँखें' या चित्रपटास स्वतंत्रपणे संगीत दिले. पण एक्कावन सालच्या 'मदहोश' चे संगीत खूप गाजले. 'मेरी याद में तुम ना' हे तलतने अतिमुलायम आवाजात गायलेलं गाणं आजही लोकप्रिय आहे. मधुरता व भाव-भावनांचा उत्कृष्ट परिपोष मदनमोहन यांच्या संगीतात प्रकर्षाने जाणवतो. गझल, ठुमरी हे तर त्यांचे हक्काचे किल्लेच होते. हिंदी, उर्दूवर त्याचे उत्तम प्रभुत्व होते. हिंदुस्थानी वाद्याचा सुयोग्य वापर हे त्यांचं आणखी एक वैशिष्ट्य. ते सतारीचे विशेष चाहते होते. संगीतकार मदन मोहन यांचे १४ जुलै १९७५ साली निधन झाले.

Nashik Edition
Jun 25, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401